सुराज्य
सोलापूर

# सोलापूर, बुधवार, दि.२० जानेवारी २०२१

# एमआयटीतर्फे २१ जानेवारी पासून ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट

✔ सुराज्य/पुणे

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट दि.२१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे हा या पार्लमेंटचा प्रमुख विषय आहे.

विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने हे पार्लमेंट भरविले जात आहे.

वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन गुरुवार, दि. २१ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.०० होणार आहे. या समारंभासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरचे आरोग्य मंत्री अतिदा लक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

रविवार, दि. २४ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वा.या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचा समारोप होणार आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे, ओरिसाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नाबा किशोर दास, खासदार भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन करण्यात येत आहे.

या पार्लमेंटमध्ये महाराष्ट्राच्या आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. प्रदीप कुमार व्यास, पद्मश्री डॉ. शशांक जोशी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीच्या संचालिका डॉ. प्रिया अब्राहम, सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक डॉ. सुनील गैरोला, फोर्टीस हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल पंडित, रिलायन्स फाउंडेशनचे वैद्यकीय सल्लागार डॉ. गुस्ताद दवेर, इंडियन एक्सप्रेसच्या वरिष्ठ संपादिका अनुराधा मस्करेन्हास, आयआय बंगलुरू चे योगा प्राध्यापक प्रतीक राज, प्रो. डॉ. गौतम सेन, डॉ. वसंत लामवेकर, पद्मभूषण डॉ देवीशेट्टी, डॉ. पराश कोठारी, डॉ. जे.ए. जलाल, डॉ. एस.पी. कलंत्री, डॉ. जरिर उदवाडिया, डॉ. कृष्ण खंजर, डॉ. अनिल कावपाल, डॉ. मंजिरी घराट, पद्मश्री डॉ. परवेज ग्रांट, डॉ. पराग संचेती, डॉ. सुचित्रा नागारे, डॉ. अदिती कराड, राजीव येरवडेकर, डॉ. दिलीप गोडे, ले.जनरल डॉ. एम.डी. व्यंकटेश, डॉ. कन्नन रंगारामानुजम, हिमाचल प्रदेशचे आरोग्य मंत्री डॉ. राजीव सैझल, डॉ. अरुण जामकर, डॉ.ओम श्रीवास्तव, डॉ. अजित देशपांडे, राजीव नाथ, डॉ. मृदुला बेले, डॉ. हेमंत पंखाली, शिवकुमार कुंढाले, पद्मश्री शशांक जोशी, पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. अभिजित राय चौधरी, डॉ. वाय. के. गुप्ता, डॉ. जयंत खंदारे, पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, पद्मश्री डॉ.दर्शन शंकर, आचार्य बालकृष्णन, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. रोहित महादेव साळे, डॉ. सुरेश बी. पाटणकर, डॉ. जवाहर जे. शाह, डॉ. नितीन कर्णिक, डॉ. धनंजय केळकर, डॉ. समीर जोग, डॉ. रमेश भनाल , डॉ. मोहन जोशी, डॉ लाल हिंगोराणी, संजय सिंग, अरुण झा, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. दिलीप म्हैसेकर, डॉ. रवि वानखेडकर, सुरेश शेट्टी या पार्लमेंटमध्ये विचार मांडतील.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

दैनिक नांदेड एकजूट

नांदेड, बुधवार, दि.२० जानेवारी २०२१

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे

# सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण व संशोधनावर आधारित ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट २१ जानेवारी पासून

पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, पुणेतर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट दि.२१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे (Pioneering Disruptive Reforms in Healthcare Ecosystem) हा या पार्लमेंटचा प्रमुख विषय आहे.

विश्वराज हॉस्पिटल, पुणे, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय, तळेगांव दाभाडे, पुणे आणि एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने हे पार्लमेंट भरविले जात आहे.

वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन गुरूवार, दि. २१ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ११.०० होणार आहे. या समारंभासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरचे आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

रविवार, दि. २४ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वा.या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचा समारोप होणार आहे. केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे, ओरिसाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नाबा किशोर दास, खासदार भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन करण्यात येत आहे.

या वर्ल्ड पार्लमेंटध्ये १० सत्रे आयोजित केली आहेत. ती सत्रे खालीलप्रमाणे :

: कोविड-१९ आणि त्या पलीकडेः

सत्र १: कोविड-१९ मध्ये भारताचा प्रतिसादः व्हायरस पासून लसीपर्यंत

पान ४ वर >>

वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटविषयी : वैद्यकीय शिक्षण व त्यातील संशोधन समृद्ध करून व क्षमता सुधारणे. तसेच, आरोग्य सुविधा वाढवून आरोग्यसेवेतील दुरुस्ती करण्याच्या उपायांवर चर्चा करावी. ध्येय ठरविणारे आणि त्यामध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्यांसाठी एक प्रभावी व्यासपीठ तयार करणे हे या परिषदेचे उद्दिष्ट आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्याच्या टास्क फोर्स कोविड १९ चे अध्यक्ष डॉ. संजय ओक, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एन.टी.राव (online), प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, सल्लागार प्रा. डी.पी.आपटे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस.कुचेकर, व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक श्री. रविंद्रनाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. सविस्तर माहितीसाठी www.worldhealthparliment.com या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## एमआयटी वर्ल्ड पीस...

सत्र २: भारतीय आरोग्य क्षेत्रातील समस्या : वैद्यकीय शिक्षणात सुधारणाः, सत्र ३ :वैद्यकीय शिक्षणात साथीच्या रोगांचा समावेश आणि अभ्यास क्रमातील सुधारणा, सत्र ४ : पॅरामेडिक सेवांची क्षमता आणि पोहोचमध्ये सुधारणा,सत्र ५ : आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळाचे धोरण हे आरोग्य विकासास प्रतिबंध करते का : संशोधन आणि नवनिर्मितीः सत्र ६ : औषध, वैद्यकीय उपकरणे आणि उपचारांसाठी संशोधनाला प्रोत्साहन. सत्र ७ : वैद्यकीय संशोधन : जागतिक अनुभवातून शिकणे. सत्र ८ : एकात्मिक औषध संशोधन आणि आयुषची भूमिका :आत्मनिर्भर आरोग्य यंत्रणेच्या दिशेने: सत्र ९ : स्वावलंबी आरोग्य प्रणालीची दिशा आणि धोरण. सत्र १०: आरोग्य क्षेत्रातील नियामक सुधारणा या पार्लमेंटमध्ये महाराष्ट्राच्या आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. प्रदिप कुमार व्यास, पद्मश्री डॉ. शशांक जोशी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजीच्या संचालिका डॉ. प्रिया अब्राहिम, सिरम इन्स्टिटयूट ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक डॉ. सुनिल गैरोला, फोर्टीस हॉस्पिटलचे संचालक डॉ. राहुल पंडित, रिलायन्स फाउंडेशनचे वैद्यकीय सल्लागार डॉ. गुस्त दवेर, इंडियन एक्सप्रेसच्या वरिष्ठ संपादिका अनुराधा मस्करेन्हास, आयआय बंगलुरू चे योगा प्राध्यापक प्रतिक राज, प्रो. डॉ. गौतम सेन, डॉ. वसंत नागवेकर, पद्मभूषण डॉ.देवीशेट्टी, डॉ. पराग कोठारी, डॉ. जे.ए. जलाल, डॉ. एस.पी. कलंत्री, डॉ. जरिर उदवाडिया, डॉ. कृपक खंजर, डॉ. अमित नागपाल, डॉ. मंजिरी घराट, पद्मश्री डॉ. परवेज ग्रांट, डॉ. पराग संचेती, डॉ. सुचित्रा नागरे, डॉ. अदिती कराड, राजीव येरवडेकर, डॉ. दिलिप गोडे, ले.जनरल डॉ. एम.डी. व्यंकटेश, डॉ. कन्नन रंगरामानुजम, हिमाचल प्रदेशचे आरोग्य मंत्री डॉ. राजीव सैझल, डॉ. अरूण जामकर, डॉ.ओम श्रीवास्तव, डॉ. अजित देशपांडे, राजीव नाथ, डॉ. मृदुला बेले, डॉ. हेमंत भंसाली, शिवकुमार कुंडाले, पद्मश्री शशांक जोशी, पद्मश्री डॉ. रमण गंगाखेडकर, डॉ. अभिजित राय चौधरी, डॉ. वाय. के. गुप्ता, डॉ. जयंत खंदारे, पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, पद्मश्री डॉ.दर्शन शंकर, आचार्य बाल कृष्णन, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. रोहित महादेव साने, डॉ. सुरेश श्री. पाटणकर, डॉ. जवाहर जे. शाह, डॉ. नितिन कर्णिक, डॉ. धनंजय केळकर, डॉ. समीर जोग, डॉ. रमेश भ्रमाल , डॉ. मोहन जोशी, डॉ. लाल हिंगोरानी, संजय सिंग, अरूण खन्ना, डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. दिलिप म्हैसेकर, डॉ. रवि वानखेडकर, सुरेश शेट्टी या पार्लमेंटममध्ये विचार मांडतील.

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

रत्नापूर समाचार
RATNAPUR SAMACHAR
लातूर, बुधवार, दि.२० जानेवारी २०२१

# एमआयटीतर्फे शिक्षण व संशोधनावर आधारित ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट

**लातूर/प्रतिनिधी :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ फार्मसी, तर्फे सार्वजनिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि संशोधनावर आधारित चार दिवसीय ऑनलाईन वर्ल्ड हेल्थ पार्लमेंट दि.२१ ते २४ जानेवारी २०२१ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. आरोग्य सेवा परिसंस्थेमध्ये अग्रणी व उच्च स्तरीय सुधारणा करणे हा या पार्लमेंटचा प्रमुख विषय आहे. विश्वराज हॉस्पिटल, माईर्स मायमर वैद्यकीय महाविद्यालय,आणि एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने हे पार्लमेंट भरविले जात आहे. वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे उद्घाटन गुरूवार, दि. २१ जानेवारी रोजी सकाळी होणार आहे. या समारंभासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ. हर्षवर्धन, राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख, खासदार डॉ. अंबुमणी रामदास, सिक्कीमचे आरोग्य मंत्री डॉ. मणिकुमार शर्मा, जम्मू काश्मीरचे आरोग्य मंत्री असिया नक्काश, जगविख्यात शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्मानीय अतिथि म्हणून उपस्थित राहणार आहेत.

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ कराड हे असतील.रविवार, दि. २४ जानेवारी २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वा.या वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचा समारोप होणार आहे.केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे, महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री राजेश टोपे, ओरिसाचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री नाबा किशोर दास, खासदार भारती पवार, पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने आणि सुप्रसिद्ध संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर आणि महाराष्ट्राच्या कोविड १९ टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. संजय ओक हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून वर्ल्ड हेल्थ पार्लमेंटचे आयोजन करण्यात येत आहे.

अशी माहिती राज्याच्या टास्क फोर्स कोविड १९ चे अध्यक्ष डॉ. संजय ओक, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एन.टी.राव प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, सल्लागार प्रा. डी.पी.आपटे, स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता डॉ. बी.एस.कुचेकर, व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक रविंद्रनाथ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

तरुण भारत
नागपूर, अकोला – बुधवार, दि.२० जानेवारी २०२१

# महिला सुरक्षेसाठी होणार 'शक्ती कायदा'

## गृहमंत्री देशमुख यांचे कथन

◆ वाशीम, १८ जानेवारी

महिलांच्या सुरक्षेसाठी राज्यात लवकरच 'शक्ती कायदा' अमलात आणला जाणार आहे. जलदगती पद्धतीने या कायद्याच्या माध्यमातून कार्य करून ३० दिवसामध्ये निकाल काढण्याचे प्रावधान आहे. अशी माहिती महाराष्ट्राचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दृक्श्राव्य परिषदेच्या माध्यमातून दिली.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट, पुणेतर्फे आयोजित चार दिवसीय दुसऱ्या राष्ट्रीय महिला संसदेच्या समारोप समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी झारखंडच्या राज्यपाल द्रौपदी मुरमू, नर्मदा बचाव आंदोलनाच्या संस्थापकीय सदस्य मेधा पाटकर, युकेच्या हाऊस ऑफ लॉर्डच्या सदस्य संदीप के.वर्मा, इस्रोच्या शास्त्रज्ञ रितू श्रीवास्तव, खासदार प्रणित कौर, खासदार अनुप्रिया पटेल हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.



संबोधित करताना गृहमंत्री अनिल देशमुख व विश्वनाथ कराड

अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विश्वनाथ कराड होते. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, कुलगुरू एन.टी.राव, एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे वरिष्ठ संचालक रवींद्रनाथ पाटील आणि सहयोगी संचालिका प्रा. शैलश्री हरिदास हे उपस्थित होते.

यावेळी द्रौपदी मुरमू म्हणाल्या की, शिक्षण हे विकासाचे सूत्र आहे. त्यामुळे महिलांना शिक्षित करण्यावर अधिक भर दिला जावा. यावेळी मेधा पाटकर म्हणाल्या, महिलांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. मातृत्व, दातृत्व आणि कर्तृत्व या तिन्हीं गोष्टी महिलांना चांगल्या माहिती असल्यामुळे त्यांनी अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवावा.

यावेळी प्रा. विश्वनाथ कराड म्हणाले की, मानसिक आणि बैद्धिकदृष्ट्या मजबूत करण्याच्या उद्देशाने ही संसद भरविली जात आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी शिक्षण हेच महत्वाचे माध्यम आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांना माऊली नावाने ओळखले जाते हे एकमेव उदाहरण आहे. त्यामुळे माता आणि भारतमाता याचा आदर करावा.

डॉ. रितू श्रीवास्तव यांनी इस्रोच्या कार्याची भूमिका समजावून सांगितली. भारताने अंतराळ तंत्रज्ञानात केलेल्या प्रगतीमुळे सामाजिक, आर्थिक विकासात कसे बदल होत आहेत यावर प्रकाश टाकला. आदित्य बिर्ला फाऊंडेशनच्या प्रमुख राजश्री बिर्ला आणि अभिनेत्री रविना टंडन यांनी दृक्श्राव्य परिषदेच्या माध्यमातून महिलांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.

सेवाच्या संस्थापिका पद्मभूषण डॉ. ईलाबेन भट व जम्मूचे महाराजा हरिसिंग ट्रस्टच्या उपाध्यक्ष रितूसिंग यांचा संदेश वाचून दाखविला. डॉ. एन. टी. राव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. गौतम बापट यांनी संचालन केले. रवींद्रनाथ पाटील यांनी आभार मानले. ◂*(तभा वृत्तसेवा)*

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**